ठळक बातम्या

- अन्नसुरक्षा योजनेचे लाभार्थी नसलेल्या, राज्यातल्या ४२ लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांना आगामी ३ महिने ५ किलो धान्य मोफत मिळणार

- टपाल खात्याच्या आधुनिकीकरणासाठी केंद्रीय मंत्रीमंडळाची सुमारे अडीच हजार कोटी रुपयांच्या निधीला मान्यता

- सेन्सेक्स पंधराशे तर निफ्टी ४७० अंकांनी वधारला

आणि

- आयसीसीच्या कसोटी क्रिकेट गोलंदाजांच्या क्रमवारीत जसप्रीत बुमराह संयुक्तपणे दुसऱ्या क्रमांकावर

<><><><><><>

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतल्या अन्नधान्याचा लाभ तसंच APL- डीबीटी योजनेत समाविष्ट नसलेल्या ४२ लाख ३० हजार ७८३ शेतकऱ्यांना पुढचे तीन महिने पाच किलो धान्य मोफत मिळणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. त्यानुसार माणशी तीन किलो तांदूळ, दोन किलो गहू या प्रमाणात धान्य मिळेल. सध्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत ५ कोटी ७९ लाखांहून अधिक नागरिकांना मोफत अन्नधान्य आणि आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातल्या साडे २१ लाखांहून अधिक शेतकर्यांना दरमहा १७० रुपये दिले जातात. मंत्रीमंडळाच्या इतर निर्णयांविषयी ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून

होल्ड व्हाइस कास्ट

(आरोग्य विज्ञान व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गातल्या विद्यार्थ्यांसाठीच्या वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत भोजन, निवास, निर्वाह भत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णयही राज्य मंत्रिमंडळानं आज घेतला.

नंदूरबार जिल्ह्यातल्या नर्मदा-तापी वळण योजनेसाठी ५ हजार ५४८ कोटी रुपयांच्या तरतुदीलाही आज मंत्रिमंडळानं मान्यता दिली. यात सहा वळण बंधाऱ्यांचं नियोजन असून, त्यामुळे परिसरातल्या सुमारे २६ हजार ५२६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ तसंच साडे ११ मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे.

खाजगी अनुदानित शाळांच्या विनियमनांसाठी सर्वसमावेशक असा कायदा राज्य सरकार आणणार आहे. महाराष्ट्र खाजगी अनुदानित शाळा विनियमन विधेयक, २०२६ च्या प्रारुपाला, तसंच हे विधेयक विधिमंडळात मांडायलाही मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ३२ (ब) आणि ५३ (१अ), महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक अधिनियम १९८१ या कायद्यांमध्ये सुधारणा करायला या बैठकीत मंजुरी मिळाली.)

<><><><><>

टपाल खात्याच्या आधुनिकीकरणासाठी १ हजार १४१ कोटी रुपयांच्या मदतीला केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. लॉजिस्टिक, ई-कॉमर्स, डिजिटल सुविधा आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी हा निधी वापरला जाणार आहे. याशिवाय टपाल खात्याच्या इमारतींची बांधणी आणि सुधारणेसाठी १ हजार ४९१ कोटी रुपये द्यायलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं मान्यता दिली. बांधकाम उत्पादन सामुग्रीच्या देशांतर्गत उत्पादनासाठीच्या योजनेलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिल्याचं, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

होल्ड- अश्विनी वैष्णव बाइट

तामिळनाडूतल्या कामराजर बंदरावर दुसरं कंटेनर टर्मिनल तसंच आसाममधल्या सिलचर इथं ग्रीनफील्ड विमानतळ उभारण्यालाही मंत्रीमंडळानं मान्यता दिली.

<><><><><>

मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात दिल्लीत झालेल्या आंदोलनादरम्यान झालेल्या कारवाई विरोधात दाखल झालेल्या याचिकांवर समग्र तपशीलवार उत्तर देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज केंद्र आणि दिल्ली राज्यसरकारला दिले.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत कॉक्रोच जनता पार्टीसह अनेक संघटना आणि राजकीय पक्षांनी दिल्लीत गेल्या १० ऑक्टोबरला निदर्शनं केली, त्यात अनेक नेत्यांसह निदर्शकांची धरपकड झाली होती. त्यातल्या काही प्रकरणात सरकारने जबाब दाखल केला आहे, मात्र पूर्ण कारवाईबाबत समग्र जबाब येत्या १० दिवसात दाखल करावा असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही मोहना यांच्या पीठानं सांगितलं. या जबाबानंतर याचिकाकर्त्यांना आणखी काही सांगायचं असेल तर त्याकरताही न्यायालयानं पुढच्या एका आठवड्याची मुदत दिली आहे.

<><><><><><>

ईशान्य दिल्लीत २०२० मध्ये झालेल्या दंगलींच्या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयानं शर्जील इमाम आणि उमर खालिद यांना सध्या अंतरिम जामीन देण्यास नकार दिला आहे. अंतरिम जामिनाच्या विनंतीवर विचार करण्यापूर्वी, न्यायालय पोलिसांचं म्हणणं ऐकून घेणार आहे.

<><><><><><>

नवी दिल्लीतल्या औषध परीक्षण प्रयोगशाळेत गेल्या महिन्यात केलेल्या तपासणीत तब्बल २८७ औषधं गुणवत्ता चाचणीत अपात्र ठरली तर केंद्रीय औषध परीक्षण प्रयोगशाळेत ३७ औषधांचे नमुने बाद ठरले. केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं आज ही माहिती दिली.

<><><><><><>

एसआयआर अर्थात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला विरोध करणारा ठराव झारखंड विधानसभेत आज मंजूर झाला. आता हा ठराव केंद्र

सरकार आणि इतर संबंधित प्राधिकरणांकडे पाठवला जाणार आहे. एसआयआर प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी विविध राजकीय पक्षांशी सल्लामसलत करून एक नवीन मानक कार्यप्रणाली तयार करण्याची मागणी यात करण्यात आली आहे.

<><><><><>

कर्नाटकातल्या भाजपा नेत्याच्या खुनातला आरोपी आणि माजी मंत्री विनय कुलकर्णी याचा जामीन सर्वोच्च न्यायालयानं आज रद्दबादल ठरवला आणि दोन आठवड्यात शरण यायला सांगितलं. न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करत हा नवीन निर्णय दिला. २ हजार १६ साली धारवाड इथले भाजपा नेते योगेश गौदर यांच्यवर प्राणघातक हल्ला झाला होता. याप्रकरणी कुलकर्णीसह अन्य १५ जणांवर या हत्येचा आरोप होता.

<><><><><>

भारत आणि चीन यांच्यात राजनैतिक आणि लष्करी स्तरावर नियमित चर्चा होत असून, सीमावर्ती भागात शांतता आणि सुव्यवस्था राखणं, तसंच तणाव वाढू न देणं हा त्यामागचा उद्देश आहे, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज सांगितलं. ते नवी दिल्लीत बातमीदारांशी बोलत होते. अलीकडेच पूर्व क्षेत्रात दोन्ही देशांच्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांची बैठक झाली. या चर्चेचा भर सीमा व्यवस्थापन सुधारण्यावर आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरच्या प्रलंबित प्रश्नांवर होता, असं त्यांनी सांगितलं.

स्थलांतरितांच्या प्रश्नावर भारताचं अमेरिकेसोबत सहकार्य सुरू आहे आणि भारत बेकायदेशीर स्थलांतराच्या पूर्णपणे विरोधात आहे, असं जयस्वाल म्हणाले. या वर्षात आतापर्यंत १ हजार ७०० भारतीय नागरिकांना अमेरिकेतून परत पाठवलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी केलेली खरेदी, कमी झालेल्या कच्च्या तेलाच्या किंमती, बँकांच्या समभागात झालेली खरेदी यामुळं देशातल्या शेअर बाजारांनी परवा झालेलं नुकसान पूर्णपणे भरुन काढलं. सेन्सेक्समध्ये आज १ हजार ५०२ अंकांची वाढ झाली आणि तो ८३ हजार ९३८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ४६९ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ८१९ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

गुंतवणूकदारांसाठी KYC प्रक्रीया सेबीनं आणखी सुलभ केली आहे. त्यानुसार गुंतवणूकदारांनी KYC साठी दिलेली पूरक माहिती KYC संस्थांकडे नोंदवली जाणार आहे. यामुळं सर्वत्र या माहितीचा वापर होईल आणि ग्राहकांना पुन्हा पुन्हा ती जमा करावी लागणार नाही.

<><><><><>

आयसीसी कसोटी क्रिकेट गोलंदाजांच्या क्रमवारीत भारताचा आघाडीचा गोलंदाज जसप्रीत बुमराह संयुक्तपणे दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. न्यूझीलंडविरुद्ध अनिर्णित राहिलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात बुमराहनं पाच बळी घेतले, त्यामुळे तो तीन पायऱ्या वर जात इंग्लंडच्या ओली रॉबिन्सनसोबत संयुक्तपणे दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. ऑस्ट्रेलियाचा मिचेल स्टार्क अव्वल स्थानी कायम असून, तो या दोघांपेक्षा २५ गुणांनी पुढं आहे.

फलंदाजांच्या क्रमवारीत इंग्लंडचे हॅरी ब्रूक आणि जो रूट अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकावर कायम आहेत. तर दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेंबा बावुम तिसऱ्या स्थानावर पोचला आहे. भारताचा ऋषभ पंत सहाव्या, शुभमन गिल सातव्या, तर यशस्वी जैस्वाल नवव्या क्रमांकावर पोहोचला आहे.

//<><><><><>//

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२५ नोव्हेंबर २०२६ - बुधवार